# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३**

## गृह विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**बाब क्रमांक: १, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ४७९६ | १० | "महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी, नाशिक आणि इतर प्रशिक्षण संस्थांना पर्याप्त निधी उपलब्ध करून देण्यात येऊनही या प्रशिक्षणाचा वापर पोलीस आपल्या कामकाजामध्ये करत नसल्याचे वेळोवेळी आढळून आलेले असणे, माहे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये भ्रष्टाचार आणि लाचखोरी अशा प्रकारची कारवाई झालेले सुमारे 174 अधिकारी कर्मचारी अद्यापही कर्तव्यावर हजर असल्याची बाब उघडकीला आलेली असणे, वर्षभरात 748 गुन्हे नोंद असून त्यात 727 सापळा कारवाया करण्यात आल्यानंतर यामध्ये लिप्त असलेले 174 अधिकारी कर्मचारी यांचेवर निलंबनाची देखील कारवाई करण्यात आली नसणे, त्या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (२) | ४८०३ | १० | "महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी नाशिक या संस्थेसाठी आणि इतर प्रशिक्षण संस्थांसाठी राज्य शासन वेळोवेळी पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद करीत असणे, तथापि अशा प्रशिक्षणाचा कोणताही वापर पोलीस आपल्या कर्तव्याच्या वेळी करत नसल्याचे आढळून येणे, माहे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात सांगली जिल्ह्यातील मिरज शहरात सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर असणारी घरे व काही दुकाने मध्यरात्री समर्थकांसह जेसीबी मशीनच्या साह्याने भुईसपाट केलेली असणे, त्या संदर्भात पोलिसांनी शंभर जणांवर केवळ गुन्हा नोंद करण्याच्या पलीकडे कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, राज्यातील सत्तेचा दुरुपयोग करून शेकडो समर्थकांचा जमाव घेऊन सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधी शहरामध्ये दहशत माजवीत असताना आणि शहरातील सर्वपक्षीय नागरिकांनी उत्स्फूर्तपणे बंद पाळून मूक मोर्चा काढलेला असताना सुद्धा सरकारने या प्रकरणात कोणतीही चौकशी केली नसणे, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**बाब क्रमांक: २, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (३) | ४८०२ | १० | "दहशतवादी विरोधी पथकाच्या कार्यालयासाठी आणि विविध खर्चासाठी पुरणी मागण्यांच्याद्वारे कोट्यावधी रुपयांची तरतूद राज्य शासन करीत असताना मुंबईमध्ये बॉम्बस्फोट मालिका घडवण्याची धमकी आल्याचे दहशतवाद विरोधी पथकाने कबूल केलेले असणे, माहे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात अशा प्रकारची धमकी देणाऱ्या याह्या खान उर्फ ख्वाजा गरीब नवाज लाला याला पोलिसांनी अटक केलेली असणे, सदर आरोपी लाला हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरुद्ध बारा पेक्षा अधिक गुन्ह्यांची नोंद असणे, मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षात सायंकाळी साडेसात वाजता 1993 प्रमाणे बॉम्बस्फोटांची मालिका आणि दंगल घडवण्याची धमकी आलेली असणे, यासंदर्भात पोलिसांनी अधिक चौकशी करण्याची आवश्यकता आणि अशा प्रकारचे हल्ले होऊ नये यासाठी राज्य शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (४) | ४८०७ | १० | "दहशतवादी विरोधी पथक या कार्यालयासाठी खर्चाची तरतूद पुरवणी मागण्याद्वारे करत असताना, २६/११ चा मुंबईवर झालेला आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांचा हल्ला समुद्रमार्गे झालेला असताना सागरी सुरक्षा करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या बोटी नादुरुस्त असणे, सध्या मुंबई पोलिसांकडे अत्याधुनिक स्पीड बोटी असणे, मात्र या बोटींच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी गोव्यातील एका कंपनीकडे असणे, बोट बिघडली की दुरुस्तीसाठी बराच कालावधी जात असणे, यामुळे नियमित गस्तीवर परिणाम होत असणे, त्यामुळे पोलिसांना कोळी बांधवांच्या फिशिंग बोटी मासिक भाडे तत्त्वावर घ्याव्या लागत असणे, प्रत्येक बोटीचे अंदाजे भाडे दोन ते अडीच लाख रुपये असणे, यासंदर्भात शासनाचे सागरी सुरक्षेकडे झालेले दुर्लक्ष या बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**बाब क्रमांक: ३, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (५) | ४८०५ | १० | "पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई यांचे करिता महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत नामीकेवर असणाऱ्या रुग्णालयाच्या वैद्यकीय देयाकांचे प्रदान करण्यासाठी पुरवणी मागण्यांच्याद्वारे तरतूद करीत असताना मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलिसांच्या इतर समस्यांकडे शासनाचे झालेली दुर्लक्ष, मुंबईचे विशेष पोलिस आयुक्त म्हणून देवेन भारती यांची निवड झाल्यामुळे शासनावर टीकेचे मोहोळ उठलेले असणे, या निमित्ताने पोलीस दलातील शासन व्यवस्थेचा ऱ्हास होत असणे, राज्यात एकीकडे चार-चार पोलीस महासंचालकांच्या जागा रिक्त |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
| --- | --- | --- | --- |
| | | | असताना मुंबई पोलीस आयुक्तालयातील आकृतीबंधात विशेष पोलीस आयुक्त पदाची तरतूद नसताना राज्य शासनाने विशेष पोलीस आयुक्त नेमलेला असणे, तथापि सह पोलीस आयुक्त पदाची विशेष पोलीस आयुक्त ही सुधारित श्रेणी निर्माण करताना या शिस्तबद्ध गणवेशधारी सुरक्षा सेवेत निकोप वातावरण ठेवण्यासाठी सेवेतील पद श्रेणींची रचना देखील सांभाळणे गरजेचे असणे, राज्यात अतिरिक्त महासंचालकांची 32 पदे असताना अनेक महासंचालकांची आपल्याकडे कोणतेही काम आणि जबाबदारी नसल्याची तक्रार असणे, तसेच मुंबई पोलिसात दोन सत्ता केंद्र निर्माण झाल्याने सुशासन साधता येणार नसणे, असे केल्यामुळे पोलीस खात्यात वरपासून खालपर्यंत सगळ्यांचेच मनोधैर्य खचले असणे, या संदर्भात पोलीस खात्याची विशिष्ट शिस्त पालन करण्यासाठी राज्य शासनाने देखील तिचा अंगीकार करणे आवश्यक असणे, या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**बाब क्रमांक: ५, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (६) | ४७९७ | १० | "न्याय सहाय्यक विज्ञान आणि राज्यातील न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्य शासन मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करते आणि अशा सक्षम प्रयोगशाळेंनी आपल्या बॅलेस्टिक अहवालातून सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी झाडलेली गोळी ही त्यांच्याच बंदुकीतून काढण्यात आली असल्याचा अहवाल माहे जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात दिलेला असताना देखील त्यांचेवर कारवाई करण्यास राज्य शासनाला आलेले अपयश, यासंदर्भात केवळ सत्ताधारी पक्षातील सदस्य असल्यामुळे त्यांच्या गुन्ह्यांवर पांघरून घालण्याचे काम शासनाने केल्यामुळे मुंबई शहरातील तमाम नागरिक यांच्या मनामध्ये राज्य शासनाविषयी पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०३९, राज्य उत्पादन शुल्क**<br>**बाब क्रमांक: ६, रूपये:- १,४८,०८,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (७) | ४७३६ | १०० | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभागाकरीता विविध खर्च साठी १४८०८००० इतक्या रक्कमेची तरतूद केली असणे, परंतु, माझ्या १२८ डहाणू (अ.ज.) विधानसभा मतदारसंघातील आदिवासी बांधव ताडी या फळा पासून एक द्रव्य संकलन करून ते विकले जाते त्यावर राज्य उत्पादन शुल्क हे कर आकारून आदिवासी बांधवांना नाहक त्रास देत असणे, हा त्रास थांबणे अत्यंत आवश्यक असणे, ताडी पासून निर्माण होणाऱ्या रस हा कर मुक्त करावे यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अजित पवार** |
| (८) | ४८०६ | १० | “आयुक्त राज्य उत्पादन शुल्क विभागाकरिता ‘गुप्त सेवा’ इत्यादी विविध खर्चासाठी मोठ्या प्रमाणावर अर्थसंकल्पीय तरतूद केली जात असताना गुप्त सेवांवरती शासनाचे दुर्लक्ष झाले असणे, त्यातच महाराष्ट्रात दमन बनावटीच्या दारूची आयात करणाऱ्या अनेक टोळ्या कार्यरत असणे, परंतु गुप्तसेवेतील अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष झालेले असणे, महाराष्ट्रात बंदी असलेल्या दारूची तस्करी करणाऱ्या टोळीचा माहे जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात आपल्या राज्याच्या ऐवजी ‘गुजरात’ पोलिसांनी छडा लावलेला असणे, आणि यामध्ये तलासरी पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अधिकाऱ्याचा आरोपींमध्ये समावेश असल्यामुळे गृह विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांचे यामध्ये संगणमत असल्यामुळे शेवटी गुजरात पोलिसांनी हे प्रकरण उघडकीला आणल्यामुळे अशी अवैध तस्करी रोखण्यासाठी गृह विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी एकत्र कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच माहे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने वाडा तालुक्यातील कंचाड खाणीवली रस्त्यावर दमन बनावटीच्या दारूच्या वाहतुकीवर कारवाई करून मद्यासह कार जप्त केलेली असणे, इत्यादी गुन्ह्यांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (९) | ४७४० | १० | चंद्रपूर जिल्हयातील मूल नागपूर राज्य महामार्गावर असलेल्या चितेगावलगत राज्य उत्पादन शुल्क विभागाने बनावट देशी दारू तयार करणाऱ्या कारखान्यावर माहे फेब्रुवारी २०२३ च्या सुमारास धाड टाकून जवळपास १७ लाख रूपयांचा ऐवज जप्त केलेला असणे, ज्या जागेवर बनावट देशी दारूचा कारखाना सुरू करण्यात आले आहे ती जागा एका माजी सैनिकाला शासनाकडून वाटपात मिळालेली असणे, असे असंताना सुध्दा त्या जागेवर गोटफार्म शेळी प्रशिक्षण केंद्रासाठी बँकेकडून लाखो रूपयांचे कर्ज घेतल्याने ही जागा बँकेकडे गहाण ठेवलेली असणे,मात्र या जागेचा सर्रास दुरउपयोग करून या ठिकाणी बनावट देशी दारुचा कारखाना टाकून सर्रास बनावट दारूची विक्री करण्यात येणे, या बनावट दारू कारखान्यात एका उच्च पदस्त व्क्तीचा हात असून त्याच्याच इशाऱ्यावर पोलीसांच्या व उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांच्या आर्शिवादाने हा धंदा सुरू असणे, या बनावट दारू मुळे नागरिकाच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार असून या गंभीर प्रकरणी कोणतीच कार्यवाही होत नासल्यामुळे नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०४१, वाहनांवरील कर**<br>**बाब क्रमांक: ७, रूपये:- २,६७,७३,२९,०००/-**<br>**श्री. धनंजय मुंडे** |
| (१०) | ४७६९ | १० | परळी वैद्यनाथ शहरात वैद्यनाथ हे पाचवे ज्योतिर्लिंग असणे, याठिकाणी हजारो भाविक देशाच्या कानाकोपऱ्यातून दर्शनाला येत असणे मात्र त्यांना पूरक सुविधा उपलब्ध नसणे, परळी शहराचे बसस्थानक अत्यंत जुनाट व मोडकळीस आलेले असणे, या बसस्थानाकाचे नूतनीकरण करून नव्या 200 बसेस देण्याची मागणी व प्रस्ताव असणे, सदर कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत उचित तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३००१, भारतीय रेल्वे धोरण निश्चिती, संचालन व इतर संर्कीण संघटना**<br>**बाब क्रमांक: १०, रूपये:- २,०००/-**<br>**श्री. धनंजय मुंडे** |
| (११) | ४७७० | १० | बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या जळगाव-छत्रपती संभाजी नगर-सोलापूर या रेल्वे मार्गाची मागणी प्रस्तावित असणे व त्यासाठी सर्व्हेक्षण व अन्य प्राथमिक कामे पूर्ण करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत आवश्यक कार्यवाही. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१२) | ४७४३ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नागभीड सिंदेवाही मूल हया रेल्वे लाईनचे काम करणे आणि रेल्वे स्थानकाचे आधुनिकरण करणे यासाठी निधीची अत्यंत आवश्यकता असल्याने या कामासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५५, पोलिसांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१३) | ४७९५ | १० | मलकापूर (जि.बुलढाणा) विधानसभा मतदार संघातील पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या अधिपत्याखालील पोलीस स्टेशन, नांदुरा शहर येथील इमारतचे बांधकाम हे फार वर्षापूर्वीचे असल्याने अतिशय शिकस्त झालेले आहे. आज रोजी शहर पोलीस स्टेशनची इमारत मोठया प्रमाणात पडझड झालेली आहे, त्यामुळे त्याचा वापर करणे धोकादायक होवू शकते. तरी पोलीस स्टेशन नांदुरा शहर करीता नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम मंजुर करण्यात यावे, याची सतत मागणी होत आहे यावर तातडीने करावयाची कार्यवाही . |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१४) | ४८०९ | १० | पोलीस स्टेशन, मलकापूर शहर व ग्रामीण येथील प्रशासकीय इमारत व शासकीय निवासस्थानाचे बांधकाम हे फार वर्षापूर्वीचे अतिशय जुने व शिकस्त झाल्याने तेथील शासकीय निवासस्थानाची फार मोठया प्रमाणात पडझड झालेली आहे, त्यामुळे शासकीय निवासस्थानाचा वापर करणे धोकादायक होवू शकते.तसेच बुलडाणा जिल्हा पोलीस दलात सतत होत असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेमध्ये निवड झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रात्याक्षिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर पोलीस स्टेशन मध्ये वितरीत केले जातात त्यामुळे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या संख्येत वाढ होत असुन तेथील प्रशासकीय इमारत व निवासस्थाने वापरण्यास व राहण्यास अपूरी पडत आहेत. त्यामुळे पोलीस स्टेशन अंतर्गत प्रशासकीय इमारती व शासकीय निवासस्थाने तसेच बॅरेक बांधकामाची आवश्यकता आहे. यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्रीमती सुलभा खोडके** |
| (१५) | ४७६७ | १० | अमरावती शहरातील पोलिसांच्या निवासस्थानांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून नवीन वसाहती उभारण्याबाबत मा. गृहमंत्री यांनी प्रस्ताव मागविणे, परंतू या प्रस्तावावर मंजूरी न मिळणे, त्यामुळे पसरलेली नाराजी याबाबत शासनाने चौकशी करुन अमरावती शहरातील पोलीसांच्या निवासाच्या प्रश्नांसाठी उक्त प्रस्तावानुसार निधी उपलबध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१६) | ४७७९ | १० | भंडारा जिल्हयातील साकोली तालुक्यातील पोलिस अधिकारी व कर्मचा-यांकरिता स्वतंत्र निवासासाठी ईमारतीची सोय नसणे, पोलीस स्टेशनच्या ईमारती जिर्ण अवस्थेत असणे, साकोली पोलीस ठाणे अंतर्गत एकोडी, गोंडऊमरी, सानगडी येथील पोलिस चौकीसाठी स्वतंत्र ईमारत नसणे, पोलिस चौकी येथील कर्मचा-यांच्या निवासाची व्यवस्था नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (१७) | ४७८० | १० | भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांकरिता स्वतंत्र निवासासाठी इमारतीची सोय नसणे, पोलीस स्टेशनच्या इमारती जीर्ण अवस्थेत असणे, पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस स्टेशन , पालांदूर येथील कर्मचा-यांना निवासाकरीता स्वतंत्र इमारत नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (१८) | ४७८१ | १० | भंडारा जिल्हयातील लाखांदूर तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचा-याकरिता स्वतंत्र निवासासाठी इमारतीची सोय नसणे, पोलीस स्टेशनच्या इमारती जीर्ण अवस्थेत असणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१९) | ४७४४ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, मेंडकी, सिंदेवाही, पाथरी, व्याहाड खुर्द, लोंढोली येथील पोलीस ठाण्याच्या इमारती फारच जुन्या झाालेल्या असल्याने प्रशासकीय |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कामकाजासाठी अयोग्य असणे, कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने सुदा बरोबर नसणे, त्यामुळे उपरोक्त पोलिस ठाण्याच्या प्रशासकीय नवीन इमारतीचे बांधकाम करणे व ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही या तालुक्यातील पोलिस चौक्याचे सुध्दा बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोश व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी,सावली व सिंदेवाही तालुक्यातील पोलिस ठाण्याचे प्रशासकीय नवीन इमारतीचे बांधकाम तसेच पोलिस चौक्यांचे बांधकाम करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२०) | ४७४५ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, मेंडकी, सिंदेवाही, पाथरी, व्याहाड खुर्द, लोंढोली येथील पोलीस ठाण्यात तसेच पोलिस चौकीमध्ये पोलिस निरिक्षकासह अनेक पोलिस कार्यरत असणे, या पोलिसांची सेवा अति आवश्सक सेवेत असणे, मात्र यांच्याकरीता असलेले कर्मचारी निवासस्थान फारच जुने असून राहण्यास अयोग्य झाले असणे, त्यामुळे या तीनही तालुक्यात असलेल्या पोलिस ठाणे परिसरात व पोलिस चौकी परिसरात तेथे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने नागरिकांनी तशी मागणी करणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील पोलिस ठाणे व पोलिस चौकी मध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृह विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई